# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.07.2025** **वार-शुक्रवार**

---

**उद्योग**

उद्योगांना सर्व पायाभूत सोयी सुविधा पुरविणं तसंच त्यांच्या समस्या, प्रश्न सोडविणं ही प्रशासनाची जबाबदारी असून त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयानं काम करावं, असे निर्देश विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी आज पुणे जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांसोबत आयोजित बैठकीत दिले. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद तसंच महसूल विभागानं समन्वयानं रस्त्यांवरील अतिक्रमणं मोकळी करावीत. सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं आपल्या हद्दीतील रस्त्यांवर पुन्हा अतिक्रमणं होणार नाहीत याची दक्षता घ्यावी असं पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह यांनी बैठकीत सांगितलं.

**फोन**

आपत्ती अथवा आणीबाणीच्या परिस्थितीत संपर्क कायम राहावा अथवा साधता यावा, यासाठी पुणे जिल्ह्यातील 10 तहसील कार्यालयांमध्ये सॅटेलाइट फोन सज्ज ठेवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनानं घेतला आहे. दुर्गम, दरडग्रस्त तसंच पूरप्रवण भागांमध्ये नेहमीच मोबाईल नेटवर्कची अडचण निर्माण होते. त्यामुळे दुर्घटना घडल्यानंतर त्यांची माहिती वेळेवर प्रशासनाकडं पोहोचत नाही.

**पेरण्या**

पुणे जिल्ह्यात 55 टक्के पेरण्यांची कामं पूर्ण झाली आहेत. गतवर्षीच्या तुलनेत पेरण्या कमी झाल्या असल्या तरी उर्वरित पेरण्या पुढील महिनाभरात पूर्ण होण्याची कृषी विभागाला अपेक्षा आहे. चार हजार 600 टन युरिया खताचा संरक्षित साठा ठेवला आहे, त्यापैकी एक हजार 900 टन खतसाठ्याचं वाटप करण्यात आलं आहे असं पुणे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सजंय काचोळे यांनी सांगितलं.

**अटल**

पुणे महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामानं वेग घेतला आहे. नायडू सांसर्गिक रुग्णालयाच्या जागेत हे वैद्यकीय महाविद्यालय उभारलं जात असून, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीपर्यंत इमारतीच्या दोन भागांचं काम पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. महाविद्यालय प्रशासनानं आवश्यक त्या नियमांची पूर्तता करीत नसल्याचा ठपका ठेवून राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेनं महापालिकेला नोटीस पाठविली होती. अनेकदा सूचना देऊनही विविध त्रुटी दूर करण्यासाठी कार्यवाही होत नसल्यानं महाविद्यालय बंद का करू नये? तसंच एक कोटी रुपयांचा दंड का ठोठावू नये? अशी विचारणा केली होती.

**पीकविमा**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा विमा अर्ज भरण्यासाठी सीएससी विभागास प्रती शेतकरी 40 रुपये मानधन केंद्र शासनानं निर्धारित करुन दिलं असून शेतकऱ्यांनी विमा हप्त्याव्यतिरिक्त इतर शुल्क देऊ नये, असं आवाहन विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांनी केलं आहे. विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत 31 जुलै आहे.

**गुरुतत्व**

साक्षीभाव साध्य झाल्यास कोणतेही विचार, कल्पना, भावना किंवा पूर्वग्रह नाहीत अशी एका शांत, तरल, संवेदनाक्षम अवस्था प्राप्त होते. ही साक्षीभाव अवस्था संपूर्णत: ज्ञान-विज्ञान, कर्म आणि चैतन्यानं परिपूर्ण असते. त्यामुळं साक्षीभावाच्या आधारे जीवनातल्या कोणत्याही बिकट समस्येवर यथार्थ उत्तर मिळते त्याचप्रमाणं अपेक्षित कार्यही हातून घडते आणि जीवनातला प्रत्येक क्षण आनंददायी ठरतो, असं प्रतिपादन गुरुतत्त्वयोग तत्त्वप्रणालीचे प्रणेते अभयकुमार सरदार यांनी पुण्यात केलं. गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुतत्त्वयोग संस्थेच्या शिवाजीनगर इथल्या ध्यानमंदिरात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गुरुपौर्णिमेनिमित्त 'निसर्गातील कार्यक्षमता' या विषयावर अनोखे प्रदर्शन भरविण्यात आलं आहे. निसर्गातील कोणतीही रचना, कार्यप्रणाली अतिशय कार्यक्षम असते. गुरुतत्त्वानं प्रत्येक जीवाला जगण्यासाठी, प्रतिकूल परिस्थितीत तग धरून राहण्यासाठी काही शारीरिक रचना दिल्या आहेत. या गुणधर्मांचा वापर करून प्राणिमात्र अंत:प्रेरणेनं, सहजप्रवृत्तीनं जगतात आणि त्यामुळंच ते कार्यक्षम असतात. गुरुतत्त्व हे फक्त मानावापुरतं मर्यादित नसून ते सर्व निसर्गाचं मार्गदर्शक तत्त्व आहे, याचा उलगडा या प्रदर्शनातून पाहायला मिळला.

**पाणी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत वीस टीएमसीपेक्षा अधिक म्हणजे 70 टक्के इतका पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 26 टक्के होता.

**साठे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित पाच दिवसीय विचार प्रबोधन पर्वाचं आयोजन करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी कार्यक्रम स्थळाचा सविस्तर आढावा घेतला आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून नियोजनविषयक सूचनाही दिल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात सध्या बऱ्यापैकी सूर्यदर्शन होत आहे. उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 31 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**